लोकसत्ता, पुणे २२ सप्टेंबर २०१० पृ. क्रं. १

# खगोलशास्त्र ऑलिम्पियाडचे भारतीय संघाला विजेतेपद!

**पुणे, २१ सप्टेंबर/विशेष प्रतिनिधी**

चौथ्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र व खगोलभौतिकी ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाने तीन सुवर्ण व दोन कांस्यपदकांची कमाई करीत विजेतेपद पटकावले. पुण्याचा अनिरुद्ध बापट व मुंबईच्या नीतेश कुमालसिंगने सुवर्णपदक संपादन करून त्यात सिंहाचा वाटा उचलला.

चीनमधील बीजिंगला १२ ते २० सप्टेंबर या कालावधीत हे ऑलिम्पियाड झाले. त्यामध्ये भारताकडून अनिरुद्ध व नीतेशसह इंदूरचा चिराग मोदी, पाटण्याचा शंतनू अग्रवाल आणि हैदराबादच्या सात्त्विक कोट्टूर यांनी भाग घेतला. त्यापैकी चिरागनेही सुवर्णपदक, तर शंतनू व सात्त्विकने कांस्यपदक मिळवले. लेखी परीक्षेतील सर्वोत्तम कामगिरीचा पुरस्कार

## पुण्याच्या अनिरुद्धला सुवर्ण

नीतेशने पटकावला. संघाचे नेतृत्व मुंबईच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे डॉ. अनिकेत सुळे व सिद्धार्थ महाविद्यालयाच्या प्रदीप दासगुप्ता यांनी केले. केंद्राचे प्रधान वैज्ञानिक निरीक्षक हेमचंद्र प्रधान हे निरीक्षक म्हणून संघासोबत होते.

या ऑलिम्पियाडमध्ये भारतासह चीन, कोरिया, ब्राझील, ग्रीस, पोलंड, रशिया, थायलंड यांच्यासह २२ देशांच्या २४ संघांमधील बाल खगोल वैज्ञानिकांनी भाग घेतला. लेखी परीक्षेबरोबरच रात्रीच्या आकाशाचे ज्ञान आणि खगोलशास्त्रीय प्रयोगांच्या आकलनाची चाचणी या स्पर्धेत घेतली जाते. विजेत्या भारतीय संघाचे २२ सप्टेंबरला सकाळी साडेदहा वाजता होमी भाभा केंद्रात स्वागत केले जाणार आहे. ■